To get the saving in the expenditure of project by maximum utilization of the available material for the design of Earthen section

माती भरावाचे काटछेद संकल्पन करतांना जास्तीत जास्त उपलब्ध साहीत्याचा वापर करणे व प्रकल्पाच्या खर्चात बचत करणेबाबत.

**महाराष्ट्र शासन**
**जलसंपदा विभाग**
**शासन परिपत्रक क्रमांक : संकल्पन ०४११/(२६४/२०११ ) / मोप्र-१**
**मंत्रालय, मुंबई- ३२**
**दिनांक : ०२ मे, २०११**


आवक नोंद
का.अ.सं.(सि.व.) नाशिक-३.
अधी.अभि. 9 23/5
सहा.अभि.
प्र.लि.
टेबल
आ.क्र. 932-E
दिनांक 25-5-11


## परिपत्रक

माती धरण व कालव्याच्या भरावाचे काटछेद संकल्पन करताना उपलब्ध सामुग्रीचा जास्तीत जास्त वापर करुन संकल्पन करणे अभिप्रेत आहे. तथापि, काही ठिकाणी धरणाच्या खोदकामामुळे विशेषत: जलरोधी खंदक, जलोत्सारणी, पुच्छ कालवा इ. मधून उपलब्ध झालेली माती ही धरणाच्या विविध घटकांसाठी वापरणे योग्य नसल्याचे नमूद करुन दूर अंतरावरुन खाणी मधून साहित्य वापरणे प्रस्तावित केले जाते. काही वेळा या बाबीसाठी सक्षम स्तरावर मान्यता ही घेतली जात नाही. उपलब्ध साहित्याचा वापर करुन धरणाचा काटछेद संकल्पीत केला असता, त्यामुळे आर्थिक बचत होते किंवा नाही याची तपासणी केली जात नाही. त्यामुळे प्रकल्पाच्या अंदाजपत्रकात अनावश्यक वाढ होण्याची शक्यता असते. माती भरावाचे काटछेद संकल्पन करताना सर्व प्रथम खोदकामातून उपलब्ध होणाऱ्या साहित्याचा वापर करण्याच्या दृष्टीने काटेकोर प्रयत्न करावेत. त्या साहित्याचा वापर अंतर्भूत करुन संकल्पन प्राप्त करुन घ्यावे. अशाप्रकारच्या प्राप्त होणाऱ्या संकल्पनाचा काटछेद तुलनात्मकदृष्ट्या खर्चीक वाटत असल्यास, त्या ऐवजी खाणीमधील साहित्याचा विचार करुन काटछेद संकल्पीत करावा व दोन्ही काटछेदांपैकी जो सुरक्षित व आर्थिक दृष्ट्या किफायतशीर असेल त्याचा वापर पुढील कामासाठी करण्यात यावा. उपलब्ध साहित्य निरुपयोगी ठरविण्याचा अधिकार कामास तांत्रिक मंजुरी देण्यास सक्षम असलेल्या अधिकाऱ्यांने वापरावयाचा आहे. सक्षम नसलेल्या अधिकाऱ्याने हा निर्णय घेतल्यास त्याच्यावर कार्यकारी संचालकांनी शिस्तभंगाची कार्यवाही करावी.

धरणाचे गाभा भरावासाठी काळी माती उपलब्ध नसल्यामुळे ती दूरवरुन आणण्यात येत असल्याचे विविध प्रस्तावामध्ये नमूद करण्यात येते. केवळ काळी मातीच गाभा भरावासाठी योग्य आहे असे नसून गाभा भरावासाठी विनिर्देशाप्रमाणे आवश्यक आहे अशा प्रकारची माती



३२९ १०/३/११

वापरणे अभिप्रेत आहे. त्यामुळे या बाबीचा विचार मातीकामाच्या काटछेदाचे संकल्पनेमध्ये करणे आवश्यक आहे.

पर्यायाने, भरावाच्या माती कामामधे जास्तीतजास्त उपलब्ध साहित्याचा वापर होईल याबाबतची खातरजमा संकल्पन व बांधकाम करणाऱ्या यंत्रणांनी करावी व कमीत कमी खर्चात माती भरावाच्या काटछेदाचे संकल्पन व बांधकाम होईल याबाबत दक्षता घ्यावी.

सदरील शासन परिपत्रक शासनाच्या संकेतस्थळावर उपलब्ध असून त्याचा संकेतांक क्रमांक २०११०५०२१७०८५१००१ असा आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

(राजन शहा)
शासनाचे उप सचिव

प्रत,

खाजगी सचिव, मा. मंत्री, (कृ.खो.पा.म. वगळून) जलसंपदा विभाग, मंत्रालय, मुंबई
खाजगी सचिव, मा. मंत्री, (कृ.खो.पा.म.) जलसंपदा विभाग, मंत्रालय, मुंबई
खाजगी सचिव, मा. मंत्री, (खारभूमी) जलसंपदा विभाग, मंत्रालय, मुंबई
खाजगी सचिव, मा. राज्यमंत्री, जलसंपदा विभाग, मंत्रालय, मुंबई
खाजगी सचिव, मा. राज्यमंत्री, लाभक्षेत्र विकास, जलसंपदा विभाग, मंत्रालय, मुंबई
खाजगी सचिव, मा. राज्यमंत्री, खारभूमी जलसंपदा विभाग, मंत्रालय, मुंबई
स्वीय सहायक, सचिव (जसं), जलसंपदा विभाग, मंत्रालय, मुंबई
स्वीय सहायक, सचिव (लाक्षेवि), जलसंपदा विभाग, मंत्रालय, मुंबई
स्वीय सहायक, मु.अ.(दवप्र)व सहसचिव, जलसंपदा विभाग, मंत्रालय, मुंबई
स्वीय सहायक, मु.अ.(जसं) व सहसचिव, जलसंपदा विभाग, मंत्रालय, मुंबई
स्वीय सहायक, मु.अ.(कृपातंल)व सहसचिव, जलसंपदा विभाग, मंत्रालय, मुंबई
स्वीय सहायक, मु.अ.(पा), व सह सचिव, जलसंपदा विभाग, मंत्रालय, मुंबई
सर्व तांत्रिक उपसचिव/अवरसचिव/उपअभियंता, जलसंपदा विभाग, मंत्रालय, मुंबई

प्रत आवश्यक कार्यवाहीसाठी,

कार्यकारी संचालक, महाराष्ट्र कृष्णा खोरे विकास महामंडळ, पुणे.
कार्यकारी संचालक, कोंकण पाटबंधारे विकास महामंडळ, ठाणे
कार्यकारी संचालक, तापी पाटबंधारे विकास महामंडळ, जळगांव.
कार्यकारी संचालक, गोदावरी मराठवाडा पाटबंधारे विकास महामंडळ, औरंगाबाद
कार्यकारी संचालक, विदर्भ पाटबंधारे विकास महामंडळ, नागपूर.
महासंचालक, महाराष्ट्र अभियांत्रिकी संशोधन संस्था, नाशिक.
महासंचालक, जल व भूमी व्यवस्थापन संस्था, औरंगाबाद.
जलसंपदा विभागाच्या अधिपत्याखालील सर्व क्षेत्रिय मुख्य अभियंता
मुख्य अभियंता, लघु पाटबंधारे (स्थानिकस्तर) विभाग, येरवडा, पुणे.
जलसंपदा विभागाच्या अधिपत्याखालील सर्व क्षेत्रिय अधीक्षक अभियंता
जलसंपदा विभागाच्या अधिपत्याखालील सर्व क्षेत्रिय कार्यकारी अभियंता
मोप्र-१ कार्यासन संग्रहार्थ निवड धारिका

| आवक नोंद संकल्पचित्र विभाग (वि.गृ.) क्र. | |
|---|---|
| का.अ. | |
| क.लि. | |
| वर्गीकरण | |
| आ.क्र. | |
| दिनांक | |

आ.क्र.ताशा/रेखन/ २०२८ /२०११.

महाराष्ट्र अभियांत्रिकी संशोधन संस्था
नाशिक-४.
दिनांक :- / /२०११.

20 MAY 2011

प्रति,
मा. अधीक्षक अभियंता
माती धरणे मंडळ/ दगडी धरणे मंडळ / दरवाजे मंडळ / वि.गृ.मंडळ
मध्यवर्ती संकल्प चित्र संघटना, नाशिक
यांना माहिती व योग्य त्या कार्यवाहीसाठी सविनय सादर.

मा. अधीक्षक अभियंता
धरण सुरक्षितता संघटनानाशिक यांना माहिती व योग्य त्या कार्यवाहीसाठी सविनय सादर.

| आवक नोंद म.सं.सं.(वि.गृ.) नाशिक - ४. | |
|---|---|
| अधी.अभि. | |
| सहा.अभि. | |
| प्र.लि. | |
| टेबल | 93 |
| आ.क्र. | |
| दिनांक | २८.५.११ |

सहाय्यक संशोधन अधिकारी,
महाराष्ट्र अभियांत्रिकी संशोधन संस्था
दिंडोरी रोड, नाशिक-४२२००४